महाराष्ट्र पोलीस

# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail- pilcbnskr@gmail.com**

---

**प्रेसनोट** **दिनांक:- १९/०६/२०१८**

## देवळा तालुक्यात गावठी दारू हातभट्टयांवर स्थानिक गुन्हे शाखेचे छापे

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांनी आदेशित केले प्रमाणे जिल्हयातील अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन होणेसाठी अवैधरित्या मद्याची वाहतुक व विक्री करणारे, तसेच हातभट्टीची गावठी दारू तयार करणारे इसमांवर सत्वर कारवाई करण्यात येत आहे. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी स्थागुशाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना अवैध धंदयांवर छापे टाकणेसाठी सुचना दिल्या आहे.

आज दिनांक १९/०६/२०१८ रोजी स्थागुशाचे पथक अवैध धंदयांवर कारवाई करणेसाठी गस्त घालत असतांना पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे देवळा तालुक्यातील गिरणा नदी शिवारात काही इसम हे अवैधरित्या हातभट्टीची गावठी दारू तयार करतात बाबत समजले वरून स्थागुशाचे पथकाने लोहणेर गावचे शिवारातील गिरणा नदी पात्रात अवैधरित्या सुरू असलेले गावठी दारूचे अड्डे उध्वस्त केले. सदर ठिकाणी **इसम नामे १) उलुशा रुंझा वाघ, २) अशोक अंबर जाधव**, दोन्ही रा. खालची भिलाटी, लोहणेर, ता.देवळा हे दोघे लोहणेर नदी पात्रात विनापरवाना बेकायदा अंबट उग्र वासाची गावठी दारू तयार करतांना मिळुन आले असुन त्यांचे कब्जातुन गावठी तयार करण्यासाठी लागणारे सुमारे ६००० लिटर नवसागर मिश्रीत रसायन, १०० लिटर तयार गावठी दारू, २०० प्लॅस्टीक व पत्राचे ड्रम व साहित्यसाधने असा **एकुण ३ लाख १० हजार ५४० रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त** करण्यात आला आहे. वरील दोन्ही आरोपीतांविरूध्द **देवळा पोलीस ठाणेस महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये ०२ गुन्हे दाखल** करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. व अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो. यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, पोलीस उपनिरीक्षक श्री.स्वप्निल नाईक, सहा.पोलीस उपनिरीक्षक रामभउ मुंढे, पोहवा नामदेव खैरणार, अशोक जगताप, शिवाजी जुंदरे, हनुमंत महाले, पोकॉ गणेश पवार, राजु वायकंडे यांचे पथकाने पथकाने सदर कारवाई केली आहे. जिल्हयातील अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन होणेसाठी आगामी काळात अवैध धंदयांवर सतत कारवाई सुरू राहणार आहे.